लोकमत सिंधुदुर्ग, रविवार, दि. ८ फेब्रुवारी २०१५ ४

# निसर्गाचा मानवतावादी दृष्टिकोनातून विचार करा

## विजय फातर्पेकर यांचे प्रतिपादन

**साटेली भेडशी :** पदवी हा शिक्षण प्रक्रियेतील एक छोटासा टप्पा असून शिक्षण हे आयुष्यभर जरी घेतले, तरी ते अपूर्ण आहे. निसर्ग, पर्यावरण, झाडे-झुडपे, पशु-पक्षी यांचा आपण मानवतावादी दृष्टिकोनातून विचार करतो का? या प्रश्नाचे होकारार्थी उत्तर असेल, तरच आपण सुरक्षित झालो असे म्हणता येईल, असे प्रतिपादन प्रा. विजय फातर्पेकर यांनी केले.

लक्ष्मीबाई सीताराम हळबे महाविद्यालयात गुरुवारी आयोजित केलेल्या दीक्षांत समारंभात प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य व्ही. ए. पाटील होते. संस्था सदस्य भाई परमेकर, नियामक समितीचे सदस्य विवेकानंद नाईक, परीक्षा विभागप्रमुख प्रा. दिलीप बर्वे आदी उपस्थित होते.

प्रास्ताविकात प्राचार्य डॉ. पाटील यांनी मुंबई शहराच्या विकासाला ऐतिहासिक काळापासून कारणीभूत ठरलेल्या घटकांचे विवेचन करून मुंबई शहर व मुंबई विद्यापीठाचा इतिहास कथन केला.

यावेळी प्रा. फातर्पेकर म्हणाले, धरणी माता आणि निसर्ग यांचा समतोल राखला तरच आपण जिवंत राहू शकतो, याची जाणीव प्रत्येकाला असली पाहिजे. अणुऊर्जा ही आपली गरज नाही. त्यासाठी विजेचा कमीतकमी वापर झाला पाहिजे. कोणतेही काम करताना लाजू नका. श्रमिक संस्कृतीचा आदर करा, त्यांना समजून घ्या.

एक आदर्श नागरिक बना, तोच खऱ्या अर्थाने आपल्याला सुशिक्षित म्हणता येईल, असे प्रा. फातर्पेकर यांनी सांगितले.

यावेळी मुंबई विद्यापीठात झालेल्या दीक्षांत समारंभाचे प्रमुख पाहुणे प्रसिद्ध शास्त्रज्ञ डॉ. अनिल काकोडकर यांच्या भाषणाची चित्रफीत दाखविण्यात आली. प्रा. फातर्पेकर यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना पदवी प्रदान करण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. एम. टी. बेग, आभार दिलीप बर्वे यांनी मानले. (वार्ताहर)